महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

संचालनालय,लेखा व कोषागारे,
मुंबई पोर्ट ट्रस्ट,बॅलार्ड इस्टेट,
शुरजी वल्लभदास मार्ग,
ठाकरसी हाऊस, 3 रा माळा,
विदेश टपाल कार्यालयाजवळ
फोर्ट,मुंबई-400 001.
E.Mail ID - ad.admin@mahakosh.in
jd.kosh@mahakosh.in

माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.022-22622035 ,022-22262036
संकेतस्थळ:- www.mahakosh.in

---

संदर्भ :- 1. शासन निर्णय वित्त विभाग क्र.1199/प्र.क्र.2/99/सेवा-3,दि.20.07.2001.
2. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-2002/प्र.क्र.1/सेवा-3,दि.11.01.2002
3. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन 1109/प्र.क्र.43/सेवा-3,दि.31.08.2009
4. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन 1109/प्र.क्र.44/99/सेवा-3,दि.01.04.2010.
5. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन 1111/प्र.क्र.8/सेवा-3,दि.01.07.2011.
6. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर -1212/प्र.क्र.31/सेवा-9,दि.11.02.2013.
7. शासन निर्णय वित्त विभाग क्र.आप्रयो-1012/प्र.क्र.71/सेवा-3,दि.19.01.2013.
8. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3,दि.09.12.2016.
9.शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3,दि.11.05.2017

क्र.संलेको:08-2018/स.अ.-1/प्रशा राप/आप्रयो/से.नि./दुसरा लाभ/ ६८८

दिनांक:- 01 AUG 2018

## आदेश

**विषय**:-दि.01.10.2006 ते दि.31.03.2010 या कालावधीत सेवानिवृत्त/निधन झालेल्या राज्य शासकीय अधिका-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ लागू करणेबाबत.

उपरोक्त संदर्भ क्र.1 वरील शासन वित्त विभागाच्या दि.20.07.2001 च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचा-यांना संबंधित पदावरील 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतर लागू करण्यात आलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारित स्वरुपात उपरोक्त संदर्भ क्र.4 वरील दि.01.04.2010 च्या शासन निर्णयान्वये दि.01.10.2006 पासून अंमलात आली आहे. संदर्भ क्र.8 वरील दि.09.12.2016 च्या शासन निर्णयान्वये दि.01.10.2016 ते दि.31.03.2010 या कालावधीत सेवानिवृत्त/निधन झालेल्या शासकीय अधिका-यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

सदर योजनेअंतर्गत कमाल वेतन बँड पी.बी.-3 (रु.15600-39100) ग्रेड पे 5400 पर्यंत वेतन घेणा-या कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येईल.

यास्तव संदर्भ क्र.2 वर नमूद दि.11.01.2002 च्या शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन संचालक,लेखा व कोषागारे,महाराष्ट्र राज्य,मुंबई हे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) संवर्गातील वेतन बँड रु.9300-34800 ग्रेड पे रु.4600 या सुधारित वेतनसंरचनेतील खालील नमूद अधिका-यांना त्यांच्या 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नतीच्या साखळीतील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील वेतन बँड रु.15600-39100 ग्रेड पे रु.5400 या सुधारित वेतन संरचनेत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून सुधारित सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर करित आहेत.

| अ.क्र. | **अधिकाऱ्यांचे नांव,पदनाम व कार्यालय** | **म.वि.व ले.से.गट-ब पदावरील सलग पदस्थापनेचा/ पहिला लाभ मंजूर दिनांक** | **सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभाचा दिनांक** |
|---|---|---|---|
| 1 | श्री.वासुदेव सखारामजी गोंडे,<br>लेखाधिकारी,से.नि. दि.31.07.2007<br>राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,<br>परिक्रमा खंडपिठ,5वा मजला,<br>प्रशासकीय इमारत क्र.1,<br>सिव्हिल लाईन,नागपूर | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>24.06.1995<br>पदोन्नती – लेखाधिकारी<br>01.01.2003 | देय दुसरा लाभ<br>सहाय्यक संचालक<br>24.06.2007 |
| 2 | श्री.शशिकांत प्रद्युम्न कारेगांवकर,<br>लेखाधिकारी, से.नि.दि. 30.09.2007<br>प्रादेशिक उपआयुक्त,समाज कल्याण विभाग,अमरावती. | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>01.10.1994<br>पदोन्नती – लेखाधिकारी<br>24.07.1996 | देय दुसरा लाभ<br>सहाय्यक संचालक<br>01.10.2006 |
| 3 | श्री.शिवाजी रामु इथापे,<br>लेखाधिकारी से.नि.31.05.2008<br>जिल्हा कोषागार कार्यालय, सातारा | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>01.10.1994<br>पदोन्नती – लेखाधिकारी<br>13.01.2003 | देय दुसरा लाभ<br>सहाय्यक संचालक<br>01.10.2006 |
| 4 | श्री.समर शिवदास नांदोडे,<br>लेखाधिकारी से.नि.दि.30.06.2009<br>हिशोब शाखा,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>30.06.1995<br>पदोन्नती – लेखाधिकारी<br>22.06.2004 | देय दुसरा लाभ<br>सहाय्यक संचालक<br>30.06.2007 |
| 5 | श्री.चंद्रकांत वसंत कुलकर्णी,<br>अप्पर कोषागार<br>अधिकारी,से.नि.दि.31.03.2009<br>कोषागार कार्यालय,सांगली | पहिला लाभ-लेखाधिकारी<br>01.10.1994<br>पदोन्नती – लेखाधिकारी<br>22.06.2004 | देय दुसरा लाभ<br>सहाय्यक संचालक<br>01.10.2006 |

अटी व शर्ती :-

1. या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतन श्रेणी दिल्यावर वेतन निश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणे होईल. मात्र त्याच वेतन श्रेणीत नियमित / कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.
2. या योजनेखाली दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर वेतननिश्चितीचा प्रत्यक्ष लाभ हा फक्त निवृतीवेतन विषयक /कुटुंब निवृत्तीवेतन विषयक लाभांकरिताच म्हणजेच निवृत्तीवेतन / कुटुंबनिवृती वेतन,सेवानिवृती उपदान / मृत्यु उपदान तसेच रजा रोखीकरण या लाभ मंजूरीच्या प्रयोजनार्थ अनुज्ञेय राहिल.
3. शासन वित्त विभागाचे शुध्दीपत्रक क्र.वेतन-1111/प्र.क्र.8/सेवा-3दिनांक 11.05.2017 नुसार सेवानिवृत्तीची तारीख ते दि 31.03.2010 या कालावधीसाठी त्यांना निवृत्तीवेतनाची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही. परंतु त्यांना 01.04.2010 पासून सुधारीत निवृत्ती वेतन व त्या बाबतची थकबाकी अनुज्ञेय राहिल.
4. वरील अधिका-यांनी शासन निर्णय वित्त विभाग क्र.पीएवाय-1082/सीआर 1100 (एक)/एसईआर-3, दि.06.11.1984 अन्वये वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चिती करिता हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांका पासून एक महिन्याच्या आत विकल्प द्यावा.
5. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील कर्मचा-यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक व ग्रेड वेतनानुसार द्यावा.
6. सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिका-यांच्या वेतन निश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेत स्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

(ज.र.मेनन)
संचालक,लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य्, मुंबई.

प्रत सविनय सादर :-प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) महाराष्ट्र शासन,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
प्रत सस्नेह अग्रेषित :- 1. महालेखापाल,महाराष्ट्र राज्य,मुंबई
2. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,परिक्रमा खंडपिठ,5वा मजला,प्रशासकीय इमारत क्र.1, सिव्हिल लाईन,नागपूर.
3. प्रादेशिक उपआयुक्त,समाज कल्याण विभाग,अमरावती.
4. जिल्हा कोषागार अधिकारी,कोषागार कार्यालय,सातारा /सांगली
5. जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे
6. संबंधीत अधिकारी.